# पोलीस स्टेशन उमरेड येथील पोलीसांवर हल्ला करुन पळालेल्या आरोपींना उमरेड पोलीसांनी गोथरा (गुजरात) येथून अटक केले



सदर प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, यातील नमुद घ.ता. 23/06/2022 रोजी 1.45 वा. MIDC ते मौजा मांडवा जंगल परिसरात फिर्यादी हे त्यांचे स्टॉफसह रात्र गस्त करीता शासकीय वाहनाने रवाना असताना त्यांना एम.आय.डी.सी. परीसरातील अंधारामध्ये कन्टेनरच्या समोर काही ईसम संशयीतरीत्या मिळुन आल्याने त्यांच्या जवळ जाऊन पाहणी केली असता सदर ईसम हे कंटेनरमध्ये जाउन बसले व एक पांढ-या रंगाची बोरी फेकली व कंटेनरसह पळुन जाऊ फिर्यादी यांनी त्यांच्या सोबत असलेले पोलीस अंमलदार/ 486 प्रदिप चवरे यांच्या डायल 112 वाहनाने पाठलाग केला असता अंदाजे 18 कि.मी. दुरवर गेल्यावर मांडवा जंगलाच्या परीसरात कंटेनरच्या चालकाने अचानक ब्रेक मारून कंटेनर मागे असलेल्या डायल 112 च्या पोलीस वाहनावर रीव्हर्स घेवुन जीवघेण्याच्या उद्देशाने धडक मारली असता पोउपनि/पांडे, व पोलीस अमलदार /486 प्रदिप चवरे यांनी वाहनातुन उडी घेवुन स्वतःचा जिव वाचविला त्यानंतर कन्टेनरच्या कॅबीन मधुन आरोपी हातामध्ये रॉड घेवुन फिर्यादीला मारहाण करून गंभीर जखमी केले व कंटेनर सह पळुन गेले अश्या फीर्यादीच्या तोंडी रीपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद केला.

आरोपींनी पळुन जाताना फेकलेला पांढ-या रंगाचा बोरा हा तिथुन जवळ असलेल्या फ्लीपकार्टच्या दुकाणातील असुन सदर दुकाणामध्ये घ.ता.वेळी अंदाजे 71,000 रू. चा मुद्देमाल चोरांनी चोरी करून घेवुन गेल्याने सदर घटने सबंधाने पो.स्टे. ला अपराध क्र. 392/222 कलम- 457,380 भा.द.वी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर दोन्ही गुन्ह्यातील आरोपी हे एकच असुन सहा चाकी कथ्या रंगाच्या कंटेनर सह दिसुन आल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले होते.

गुन्ह्याच्या तपासा दरम्यानआरोपी हे कंटेनर अमरावती जिल्ह्यातुन आल्याचे समजल्याने आम्ही पो.उप.नि./खोटेले, सोबत स्टॉफ पो.ना./574 राधेश्याम कांबळे, पो.ना./486 प्रदिप चवरे, पो.ना./870 पंकज बट्टे यांच्या सह जिल्हा अमरावती येथील पो.स्टे. चांदुर बाजार, पो.स्टे. शीरजगाव,पो.स्टे. मोर्शी बॉर्डर चेक पोष्ट खापरी ( महाराष्ट्र ते मध्य प्रदेश बॉर्डर ) पर्यंत जाऊन तेथील मुख्य मार्गावरील सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासले असता. सदर ठिकाणी गुन्ह्यातील कथीत कंटेनर हा येत

असल्याचे अस्पष्ट दिसुन आले परंतु त्यांचा क्रमांक दिसुन आला नाही तसेच अमरावती वरून नागपुर जिल्ह्याकडे येताना पडणा-या टोल प्लॉझा वरून सुध्दा कथीत कंटेनर बाबत फुटेज तपासले असता सदर मार्गाने कंटेनर न आल्याचे दिसुन आले. त्यानंतर दोन्ही गुन्ह्याच्या घटनास्थळाला भेट देवुन कंटेनर ज्या मार्गानी पळुन गेला तेथील फुटेज तपासले सदर कंटेनर हा मुख्य मार्ग सोडून लहान खेडे गावातुन पळुन गेल्याने व सदर परीसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे उपलब्ध नसल्याने कंटेनर नेमका कोणत्या मार्गाने गेला या बाबत उलगडा होत नव्हता सदर रोडना जोडणा-या मोठ्या शहरात जाउन सुध्दा कंटेनर बाबत माहीती घेतली परंतु कंटेनर हा तीकडे गेलाच नसल्याने व कंटेनर चालकाचा पळुन जातानाचा मोडस हा मुख्य मोठा मार्ग सोडुन जाण्याचा असल्याने तर्काद्वारे आम्ही बेसुर मुख्य चौकातील सीसीटिव्ही फुटेज चेक केले असता सदर कंटेनर तेथुन यु टर्न घेताना दिसुन आल्याने सदर तर्कानुसार पो.स्टे. चिमुर जि- चंद्रपुर हद्दीत जाऊन कंटेनर बाबत रोड वरील कॅमेरे चेक केले असता सदर कंटेनर हा चिमुर येथे न जाता भीसी मार्गे जांभुळघाट येथुन पुन्हा लहान रोडनी कान्पा टेन्पा येथुन नागपुर-उमरेड – गडचीरोली मार्गाने गेल्याचे फुटेज मध्ये दिसुन आले वरुन पो.स्टे. नागभीड जि- चंद्रपुर हद्दीत जाउन शोध घेतला असता कंटेनर हा पुन्हा तीथुन मुख्य मार्ग सोडुन नागभीड कडुन ब्रम्हपुरी कडे गेल्याने ब्रम्हपुरी टोल प्लॉझा ला भेट दिली असता सदर ठिकाणी फक्त 04 दिवसांचा बॅक अप असल्याने कंटेनर सबंधाने फुटेज मीळुन आले नाहीकरीता तेथील कर्मचारी यांच्या कडुन गेलेल्या वाहनाची लिस्ट प्राप्त करून लीस्टवरील वाहनाचे क्रमांकाशी संपुर्ण डीटेल्स काढले परंतु गुन्ह्यातील कथीत कन्टेनरच्या मॉडलेशी लिस्टमधिल वाहनां सोबत मॅच होत नव्हती. त्यामुळे सदर टोल नाक्याच्या अंदाजे 02 की.मी. पहीले व टोल नाक्याच्या 02 की.मी. नंतर चे फुटेज चेक करून तीथुन जायला लागणारा वेळ गृहीत धरून टोल नाक्यावरून गेलेल्या वाहनांची लीस्ट व फॉस्ट टॅग आय.डी. क्रमांक प्राप्त केला असता कन्टेनरचा क्रमांक **GJ-17 UU 9561**हा व त्याचा टोल प्लॉझा वर वापरलेला फॉस्ट टॅग आय डी. क्र. **34161FA8203289722B074760** हा असल्याचे दिसुन आले मीळुन आलेला कन्टेनरचा क्रमांक **GJ-17 UU 9561** विनोदभाई विरसंगीभाई महीदा रा-नान्ही रेल्वे बलीया जि- दोहाड (गुजरात )याच्या नावावर तसेच वरील प्रमाणे मिळालेली फॉस्ट टॅग आय.डी. ही उस्मानगणी मोहम्मद कॅफीवाला रा- गोद्रा जि- पंचमहल ( गुजरात ) याच्या नावाने असल्याचे दिसुन आले सदर मीळालेला कंटेनर क्रमांक हा बनावट असल्याचा आम्हाचा संशय असल्याने मीळालेल्या फॉस्ट टॅग आय डी. ची बॅकेद्वारे ई- स्टेटमेन्ट काढुन चेक केले असता सदर कंटेनर हा विवीध टोल प्लॉझा वर गेल्याचे दिसुन आल्याने सदर टोल प्लॉझा यांच्याशी सपर्क करून विचारपुस केली असता सोन -वे टोल प्लॉझा ईदौर (म.प्र.) यांच्या कडील फुटेजची पाहणी केली असता सदर कंटेनर याला त्याचा मुळ क्रमांक**GJ-17 XX 0976**हा लागलेला असुन क्रमांका वरून मुळ मालकाचा पत्ता काढला असता याचे सुध्दा नाव उस्मानगणी मोहम्मद कॅफीवाला रा- गोद्रा जि- पंचमहल (गुजरात) याच्याच नावानीशी असल्याचे निष्पन्न झाले तसेच त्यांनी **34161FA8203289722071B920** या क्रमांकाचा फॉस्ट टॅग आय.डी. वापरल्याचे सुध्दा तपासात दिसुन आले व हा सुध्दा उस्मानगणी मोहम्मद कॅफीवाला रा- गोद्रा जि- पंचमहल (गुजरात) याच्याच नावानिशी असल्याचे दिसुन आले त्यानंतर ई- कोर्ट द्वारे अप्स द्वारे सुध्दा मिळालेले नाव उस्मानगणी मोहम्मद कॅफीवाला याची माहीती काढली असता त्याच्या वर या पुर्वी सुध्दा अश्याच प्रकारचे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे दिसुन आले फॉस्ट टॅग आय.डी. वरून मोबाईल क्रमांक प्राप्त करून त्याचा कॅप डीटेल्स काढली असता कॅफ फॉर्म वर व टोल प्लॉझा वर दिसुन आलेल्या फोटोतील ईसम हा जवळपास एकसारखेच दिसुन आले वरून वरीष्टांच्या मार्गदर्शनाखाली व त्याच्या परवानगीने गोद्रा जि- पंचमहल (गुजरात ) येथे जाण्याची परवानगी घेवुन सोबत स्टॉफ स.पो.नि./शरद भस्मे, पो.उप.नि./ दिनेश खोटेले पो.ना./486 प्रदिप चवरे, पो.ना./574 राधेश्याम कांबळे, पो.ना./870 पंकज बट्टे, पो.ना./2096 नितेश राठोड, पो.ना./2167 रविंद्र जाधव असे पथक तयार केले व गोद्रा जि- पंचमहल (गुजरात) येथे जाउन निष्पन्न असलेला नाव उस्मानगणी मोहम्मद ईब्राहीम कॉफीवाला याच्या राहत्या घरी जाउन विचारपुस केली असता माहीती मीळाली की, त्याला अंदाजे 02 दिवस आधीच जि- बालाघाट पो.स्टे. मलाजखंड (म.प्र.) यांनी अटक चोरी च्या गुन्ह्यात अटक करून घेवुन गेल्याचे माहीती मीळाली त्यानंतर आमच्याकडे असलेल्या टोल प्लॉझा वरील फुटेजच्या आधारे दिसत असलेल्या ईसमाचे नाव विचारले असता त्याचे नाव ईरफान उर्फ जाफरू असल्याचे माहीती पडल्याने

त्याच्या राहत्या घरी जाउन त्याला ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव ईरफान उर्फ जाफरू फारूक बांडी वय- 60 वर्ष,असे सांगीतले तसेच त्यांना विचारपुस केली असता त्याने फ्लीपकार्टच्या दुकाणातील सामान चोरी केल्याचे व पाठलाग करताना पोलीसांवर हल्ला केल्याचे तोंडी सांगीतले तसेच सदर वेळी त्यांच्या सह उमर उर्फ पंपोई अब्दुल सत्तार जादी, पव्या नाईक व एक ईसम याच्या सह केल्याचे सांगीतलेयांचा शोध घेतला असता हे मीळुन आले नाही. करीता आरोपी नामे (1) ईरफान उर्फ जाफरू फारूक बांडी याला ताब्यात घेवुन अटक करण्यात आली तसेच आरोपी क्र. (2) उस्मानगणी मोहम्मद ईब्राहीम कॉफीवाला याला प्रोड्युस वारंट द्वारे अटक करून गुन्ह्याचा तपास केला असता त्यांच्या कडुन गुन्ह्यात पोलीसांवर हल्ला करताना वापरलेली रॉड जप्त करण्यात आली तसेच चोरी सबंधाने दाखल असलेल्या गुन्ह्यातील मुद्देमाल हा आरोपींनी पळुन जाताना ब्रम्हपुरी ते वडसा येथील वैनगंगा नदीच्या पुलाच्या खाली ठेवला होता असे असे कबुली जवाबात सांगीतले वरून सदर ठिकाणी जाउन पाहणी केली असता गुन्ह्यातील ठेवलेला मुद्देमाल मीळुन ला नाही परंतु सदर ठिकाणी ज्या बो-यामध्ये सामान चोरी करून नेला होता ती बोरी व प्लॉस्टीकचे फ्लीपकार्ट कंपनीचे सील साहीत्य चिखलाने माखलेल्या अवस्थेत दिसुन आल्याने ते मेमोरडंम पंचनाम्या प्रमाणे जप्त करण्यात आले. तसेच गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

सदर गुन्ह्याचा तपास हा मा. पोलीस अधिक्षक श्री. विजयकुमार मगर, उपअधिक्षक श्री. राहुल माकणीकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. भीमराव टेळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद घोंगे, स.पो.नि./ शरद भस्मे, पो.उप.नि./ दिनेश खोटेले, पो.ना./486 प्रदिप चवरे, पो.ना./574 राधेश्याम कांबळे, पो.ना./870 पंकज बट्टे, पो.ना./2096 नितेश राठोड, पो.ना./2167 रविंद्र जाधव सर्व पो.स्टे. उमरेड ना.ग्रा. व सायबर सेल ना. ग्रा. येथील सपोनि/ठाकुर, पोना/400 सतिश राठोड यांनी पार पाडली आहे.



तपासी अधिकारी
पो.नि प्रमोद घोंगे
ठाणेदार पो.स्टे उमरेड